# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

क्र.एचओ/६२९/एन.सी.डी, दि.१८.११.२०२६.

## जाहिरात

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या असंसर्गजन्य रोग विभागांतर्गत विविध पदांसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याकरिता मा.महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

तसेच कार्यकारी आरोग्य अधिकारी यांची मंजुरी क्र.एच.ओ./६२८/एन.सी.डी, दि.१८.११.२०२६ अन्वये सद्यस्थितीत असंसर्गजन्य रोग विभागांतर्गत कंत्राटी कार्यक्रम समन्वयक (Program Coordinator) व डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator) ही रिक्त पदे जाहिरात देऊन निवडीच्या गुणांकन पद्धती निकषाद्वारे भरण्याकरीता मंजुरी प्राप्त आहे.

सदर पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत असुन निवडीच्या गुणांकन पद्धती निकषाद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येणार आहे.

याची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर, प्रमुख वर्तमानपत्रात तसेच तिसरा मजला, एफ/दक्षिण, मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई ४०००१२ आणि वॉर्ड क्र.३८, असंसर्गजन्य रोग विभाग, कस्तुरबा रुग्णालय, चिंचपोकळी – ४०००११ या कार्यालयातील सूचना फलकावर दि.१९.११.२०२६ ते दि.२६.११.२०२६ रोजी पर्यंत प्रदर्शित करण्यात येईल.

| अनु क्र. | पदनाम | पदसंख्या | दरमहा वेतन (रु.) | वयोमार्यादा (०१.०९.२०२६ रोजी) |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यक्रम समन्वयक (Program Coordinator) | १ | रु.४०,०००/- प्रतिमाह | ३५ वर्ष<br>सेवानिवृत्त कर्मचारी ६२ वर्ष |
| २ | डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator) | २ | रु.१८,०००/- प्रतिमाह | ४५ वर्ष |

**अ) शैक्षणिक अर्हता व पातत्रा निकष:-**

**१) कार्यक्रम समन्वयक(Program Coordinator)**

- उमेदवार एम.बी.बी.एस (M.B.B.S) किंवा अन्य वैद्यकीय (BAMS / BHMS / BDS)शाखेतील महाराष्ट्र वैद्यकीय परिषद किंवा राष्ट्रीय वैद्यकीय परिषद मान्यताप्राप्त पदवीधारक असावा.
- सार्वजनिक आरोग्य/आरोग्य प्रशासन (Diploma/Masters in Public Health/DHA/CHA) विषयातील पदव्युत्तर उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

- उमेदवारास सार्वजनिक/निम-सरकारी संस्था यामध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात काम करण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराजवळ 'एम.एस.सी.आय.टी' परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४.०२.२०१३ आणि शासन पुरक पत्र क्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०८.०१.२०१८ तसेच, शासन पुरक पत्र क्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.१६.०७.२०१८ मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचानलयाने यासंदर्भात यापुढे वेळोवेळी निर्गमित केलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंमलात आणलेल्या परिपत्रकातील तरतुदी लागू होतील.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेतील समकक्ष पदाचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**२) डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator)**

- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
- उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय (उच्चस्तर/निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
- उमेदवाराजवळ 'एम.एस.सी.आय.टी' परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९,दि.०४.०२.२०१३ आणि शासन पुरक पत्र क्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०८.०१.२०१८ तसेच, शासन पुरक पत्र क्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.१६.०७.२०१८ मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचानलयाने यासंदर्भात यापुढे वेळोवेळी निर्गमित केलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंमलात आणलेल्या परिपत्रकातील तरतुदी लागू होतील.
- उमेदवाराने टंकलेखन (६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचे) शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण केलेले असावे व याबाबतचे महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे. टंकलेखनाचा अपेक्षित वेग कमीत कमी मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि.व डेटा एन्ट्रीचा वेग ८००० की डीप्रेशन्स इतका अवगत असावा.
- एम. एस. वर्ड, एक्सेल व मूलभूत सांख्यिकीय तंत्राच्या संगणक प्रणालीची माहिती असावी तसेच विविध प्रकाराचे कॉम्प्युटर प्रोग्रामिंग करता येणे आवश्यक.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेतील समकक्ष पदाचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.

उपरोक्त अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांनी दि.**<u>१९.११.२०२६ ते दि.२६.११.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता पर्यत</u>** सोबत जोडलेल्या अर्जाचा नमुन्यामध्ये अचुक माहिती भरुन व संबंधित सर्व कागदपत्रे (खालील दिलेल्या यादीनुसार) सोबत जोडून दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष उपस्थित राहून/टपालद्वारे जमा करण्यात यावे. दि.२६.११.२०२६ रोजी संध्याकाळी ०५:०० नंतर येणा-या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**<u>अर्ज पाठविण्याचा पत्ता: वॉर्ड क्र. ३८, तळ मजला, असंसर्गजन्य रोग विभाग,</u>**
**<u>कस्तुरबा रुग्णालय, आर्थर रोड जेल समोर, संत साने गुरुजी मार्ग,</u>**
**<u>चिंचपोकळी, मुंबई – ४०००११.</u>**

उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी यथावकाश बोलविण्यात येईल.

पदनिहाय मुलाखतीसाठी हजर राहणा-या उमेदवाराकडून अर्ज घेऊन निवडीच्या **गुणांकन पद्धती निकषाद्वारे** पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. मुलाखती नंतर निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करून सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल व निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्ती आदेश देण्यात येतील.

**<u>सदर पदांकरिता (अर्हतेनुसार)आवश्यक कागदपत्रांची यादी.</u>**

- अर्जाचा नमूना
- SSC गुणपत्रक व प्रमाणपत्र
- HSC गुणपत्रक व प्रमाणपत्र
- पदवी गुणपत्रक व प्रमाणपत्र
- पदव्युतर गुणपत्रक व प्रमाणपत्र
- अतिरिक्त डिग्री/डिप्लोमा/प्रमाणपत्र
- MSCITप्रमाणपत्र/संगणक प्रमाणपत्र
- टंकलेखन प्रमाणपत्र
- अनुभव प्रमाणपत्र

**सही/-**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

**अर्जाचा नमूना**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते

**पदाचे नाव–**

उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पार पत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी
२.५से.मी.- ३से.मी.

**प्रति,**

**मा.उपकार्यकारी आरोग्य अधिकारी (एन.सी.डी)**
**वॉर्ड३८, कस्तुरबा रुग्णालय, चिंचपोकळी, मुंबई.**

| | | |
|---|---|---|
| १ | **(अ)संपूर्णनाव (आडनाव प्रथम)** | |
| | **(ब) वडिलाचे/पतीचे संपूर्ण नाव** | |
| | **(क) उमेदवाराचे लग्नापूर्वीचे संपूर्ण नाव (महिला उमेदवारांच्याबाबतीत)** | |
| २ | **पत्ता (पत्रव्यवहाराचा)**<br>घर क्रमांक/इमारतीचे नाव<br>गाव/रस्त्याचे नाव<br>विभागाचे/तालुका आणि जिल्हा नाव<br>पिनकोड नं. | .....<br>.....<br>.....<br>.....<br>..... |
| ३ | **लिंग (पुरुष / स्त्री)** | |
| ४ | **जन्म दिनांक** | |
| ५ | **मोबाईल नंबर** | |
| ६ | **ई-मेल आय.डी** | |

**७. शैक्षणिकअर्हता:-** (सर्वात अलीकडील पासून सुरू)

| परीक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | शालांत परीक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राप्त गुण | पैकी | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

८. **संगणक विषयक ज्ञान:** MS-CITकिंवा शासनाने विहित केलेले संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे/ नाही

९. **मराठी ३० श.प्र.मि व इंग्रजी ४० श.प्र.मि** टंकलेखन परीक्षा उर्तीण झाल्याचे प्रमाणपत्र:आहे/ नाही
(डेटा एन्ट्री आपॅरेटर पदासाठी)

१०.**स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता:**_____

_____

_____

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अहर्तेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक: आपला/आपली विश्वासू,

ठिकाण:-

अर्जदाराची सही/-

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते

**<u>कंत्राटी तत्वावर नियुक्त करावयाच्या पदाकरीता अटी व शर्ती:-</u>**

- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या पदाकरीता विहीत केलेल्या अर्हता धारण करणारे असावे.
- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणाऱ्या पदाकरीता संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे.
- उमेदवाराने एकदा अर्ज केल्यानंतर विहित वेळ समाप्त झाल्यानंतर कोणतेही कागदपत्रे आणून दिल्यास ते कागदपत्रे ग्राहय धरले जाणार नाही व त्याचा अर्ज अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल.
- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या पदाकरीता मराठी वाचता, लिहिता, बोलता येणे आवश्यक आहे.
- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणर नाही.
- कराराच्या कालावधीत कंत्राटी कर्मचा-यांना हमीपत्र सादर करावे लागेल.
- कंत्राटी कर्मचा-यांना जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रति महिना निश्चित मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.
- कंत्राटी पद्धतीवरील नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवारास साप्ताहीक सुट्टी (रविवार) व सार्वजनिक सुट्टी (रुग्णालयातील कर्मचा-यांना लागु असलेल्या) तसेच परिपत्रक क्र.संचालक/वै.शि.प्र.रु./३६४४, दि.१४.१०.२०२२ नुसार सार्वजनिक आरोग्य खात्याच्या असंसर्गजन्य रोग विभागाअंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना क्र. काअ/००५२०१/आ.१, दि.२३.०५.२०२३ नुसार १७९ दिवसांकरिता समप्रमाणात ७$^{१/२}$नैमित्तिक रजा महानगरपालिकेच्या प्रचलित पद्धती अन्वये अनुज्ञेय राहतील.
- उमेदवाराची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात केवळ १७९ दिवसांकरीता दि.<u>.....२०२६ ते</u> दि.३१.०३.२०२७ पर्यंत करण्यात येत आहे. सदर नेमणूक दि.३१.०३.२०२७ नंतर आपोआप संपुष्टात येईल.
- नेमणुकीच्या विहित कालावधीत विवक्षित कामपुर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेलया कर्मचा-यांची राहील.
- कराराच्या कालावधीत संबंधित कर्मचा-यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.
- कराराच्या कालावधीमध्ये सदर कर्मचा-यांना बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावली मधील नियम लागू राहणार नाही. ही नेमणूक निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असेल.
- कंत्राट पध्दतीचे काम करणा-या कर्मचा-यांचे काम कराराच्या कालावधीमध्ये जर असमाधान कारक असेल तर अशा कर्मचाऱ्याना कंत्राट पध्दतीवरील नियुक्ती, कोणतीही पुर्व सूचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.
- अर्ज विहित नमुन्यात स्व-हस्ताक्षरात सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

----------x-x-x----------